**MINUTES OF THE PUBLIC HEARING FOR PROPOSED EXPANSION OF EXISTING SUGAR UNIT CAPACITY FROM 4,900.0 TCD TO 15,000.0 TCD, CO-GEN POWER FROM 22.5 MW TO 100.0 MW AND MOLASSES/CANE SUGAR BASED DISTILLERY– 60.0 KLPD TO 1,100.0 KLPD, AT POST- UPALAVE, TAL – PHALTAN, DIST – SATARA, MAHARASHTRA BY PROJECT PROPONENT M/S SWARAJ INDIA AGRO LTD. (SIAL),**

The Public Hearing for proposed expansion of existing Sugar Unit Capacity from 4,900.0 TCD to 15,000.0 TCD; Co-Gen Power from 22.5 MW to 100.0 MW and Molasses / Cane Juice Based Distillery Plant – 60 KLPD to 1,100 KLPD At Post – Upalave, Tal - Phaltan, Dist – Satara, Maharashtra by Project Proponent M/s Swaraj India Agro Ltd. (SIAL), was conducted on Wednesday, the 20th October, 2021 at the existing site of the said industry at 11.00 a.m.

District Collector, Satara approved the date of public hearing on Wednesday, the 20th October, 2021 and as per the Notification dated 14-09-2006 issued by Ministry of Environment, Forest & Climate Change, Govt. of India, (MoEFCC, GoI), New Delhi and subsequent amendment on 01-12-2019, Member Secretary, Maharashtra Pollution Control Board, Mumbai has constituted Public Hearing Panel vide Board's Office Order No. E- 92 of 2021 under letter no. BO/JD (WPC)/PH/B- 211014-FTS-0150, dated 14-10-2021:-

| | |
|---|---|
| 1) District Magistrate-Satara or his representative not below the rank of an Additional District Magistrate | **Chairman** |
| 2) Regional Officer, MPCB, Pune (Representative of Maharashtra Pollution Control Board) | **Member** |
| 3) Sub Regional Officer, MPCB, Satara | **Convener** |

Shri L. S. Bhad, Sub Regional Officer, MPCB, Satara and Convener of the Environment Public Hearing Committee welcomed Shri Sunil Thorve, Additional District Magistrate, Satara and Chairman of the Environment Public Hearing Committee; Shri Nitin Shinde, I/c Regional Officer, MPCB, Pune and Member of the Environment Public Hearing Committee; Environmentalists, NGOs, Journalists and Company Officials and local people/participants who were present and informed that as per the Environment Impact Assessment Notification of Ministry of Environment, Forest & Climate Change, Govt. of India, (i.e. MoEF & CC, GoI) dated 14th September, 2006 as amended on 1st December, 2009, it is mandatory to conduct prior public consultation to certain projects which are covered in the schedule of the said Notification.

Convener of the Environment Public Hearing Committee informed that the meeting is called in the background of Covid-19. Hence, it is requested all the participants to follow strict guidelines of Govt. of India. As per the guidelines, only 100 persons are allowed in a session. If the participants are more, then remaining will be allowed in next session. The sessions will continue till all the participants are given opportunity to attend the meeting. The thermal scanning and use of sanitizer is kept at the entrance of the pandol and it is compulsory to wear a mask and follow the social distancing amongst the persons in the meeting hall.

Maharashtra Pollution Control Board was in receipt of application from Project Proponent M/s Swaraj India Agro Ltd. (SIAL), At Post – Upalave, Tal - Phaltan, Dist –

Satara, Maharashtra for their proposed expansion in existing unit of Sugar Capacity from 4,900.0 TCD to 15,000.0 TCD; Co-Gen Power from 22.5 MW to 100.0 MW and Molasses / Cane Juice Based Distillery Plant – 60 KLPD to 1,100 KLPD .

The Convener further informed that this existing project is established outside the Industrial Zone and as per EIA Notification, 2006 the category of project falls under Category A 1 (d), 5 (j) and 5 (g), which requires to obtain prior Environmental Clearance from the Environment, Forest and Climate Change Department, Govt of India, New Delhi (MoEF & CC, GoI), for which prior environmental consultation is mandatory.

Convener informed that the aim of conducting prior public consultation is to make aware, local people who can be participate in the hearing and they should know the developmental activities and Environment Management Plan of the unit.

Project Proponent had submitted online prescribed application alongwith pre-feasibility report to the MoEF & CC, GoI, New Delhi for Terms of Reference (ToR) to conduct of EIA studies and MoEF & CC, GoI, New Delhi has considered the project and given online approval on 14-05-2021.

As per said Notification, 30 days' advance public notice was published by Sub Regional Office, MPCB Satara in the Local Newspaper in Daily Pudhari for Marathi and in National Newspaper daily Indian Express for English on 19/09/2021. The public were appealed to send their suggestions, views, doubts or objections regarding the proposed unit. Mr. H. Madhubabu, President, Rihas, Rural Environment Education and Health Awareness Society, Mushirabad, Hyderabad sent notifications and support via e-mail.

Also copy of EIA report and executive summery were made available at various notified offices of Government i.e. Ministry of Environment, Forest & Climate Change, Zonal Office, West Central Zone, New Secretariat Building, Ground Floor, East Wing, Civil Line, Nagpur-440 001; District Magistrate Office, Satara; Zilla Parishad Office, Satara; District Industries Centre Office, Satara; Tahsildar Office- Phaltan, District – Satara; Grampanchayat office at Upalave, Tal – Phaltan, District – Satara, Sub Regional Office, MPCB, Satara; Regional Office, MPCB, Pune and at Head Office of MPCB at Mumbai, Environment & Climate Change Department, Govt. of Maharashtra, New Administrative Building, Mantralaya, Mumbai and on the website of MPCB. The public in general were appealed to send any suggestion or objections, if any regarding the proposed new distillery project.

Convener informed that participants can raise their views, suggestions/objections for the proposed expansion of the project in environmental angle only, orally as well as in writing also.

With the permission of Chairman, Project Environment Consultant gave presentation on geographical location of the proposed unit, proposed impact on the environment due to proposed project and details of Environment Management Plan of the proposed unit.

Environment Consultant informed that Project Proponent has planned for various pollution control measures with the capital cost of Rupees 2,020/- Lakh and for their annual maintenance, Rs. 79.45 lakhs are reserved.

The Project Proponent have fixed 0.5% as per the guidelines of the Government of India in the Corporate Environment Responsibility Fund (CER Fund). The total cost of the project is Rs 950 crore. The project promoters have proposed Rs 4.75 crore which will be spent in the first five years as per the instructions.

It is informed by the Environment Consultant that not a drop of treated/untreated effluent will be discharged outside the factory and this project is Zero Liquid Discharge (ZLD). Due to expansion of the project, local people will get job opportunities and there will be tremendous increase in the local business.

A Electro Static Precipitator will be installed to prevent the air pollution in the project. The expansion of the project will provide direct employment opportunities to the locals and will also benefit the indirect business in the area.

The Environmental Consultant said that since the project expansion will be done on existing site, no additional land will be required for the expansion. Sugarcane contains 70% water. The wastewater generated during the production process will be processed and reused in the manufacturing process.

After presentations, Convener, Environment Public Hearing Committee appealed the participants to raise their views, suggestions or objections regarding propose plant in environmental angle only. Also written suggestions and support from N. Ramesh, Environmental Social Worker, Hyderabad, Telangana and K. Ashok, President Save Earth Metro Urban and Rural Development Society, Hyderabad, Telangana.

**Following persons have taken part in the discussions and the answers were given by Project Environment Consultant/Project Proponent/ Environment Public Hearing Committee:-**

1) **Shri Vithal Sawant, Residence – Sawantwadi, Sitamai Dongar, Tal – Phaltan, Dist – Satara :-**

Congratulations on behalf of all our people residing in the region for planning to expand the project. It is also important to see if all Environmental Laws are followed in the project as stated in the Presentation.

The survey in the radius of 10 k.m. of the project site is carried out. However, Sawantwadi is in Upalve Gram Panchayat. Revenue is not separated. So why was the survey not conducted in Sawantwadi village?

How the wastewater generated in the project will be dispose off ?

If the wastewater is treated and recycled as mentioned in the presentation, then it is good. But we request that the wastewater should be disposed of in the project itself, not outside the project and in the river.

The environmental consultant answered that this is a very important question has been asked. The samples were collected during the survey of this area. At that time, the representative samples were also collected.

The samples, have also collected at the project location and samples have also been taken in the nearby Upalve village. The samples within the radius of 10 km. of the project site are also collected.

The second question he asked was about the wastewater generated from the project and its disposal.

As per the directives of the Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi and the Central Pollution Control Board, the distillery project has been made mandatory to have Zero Liquid Discharge (ZLD).

In the project we are going to use technology i.e. MEE, which is called as multi effect evaporator, the spent wash will be evaporated into MEE and it will be processed.

The vapors which will be generated will be treated in the CPU. (Condensate Polishing Unit) and treated water will be reused in the production process. For the pulp that is formed in it, a boiler of capacity 75 TPH will be installed and the pulp will be burnt in it.

2) **Shri Ramdas Hanumant Jadhav, Member, Grampanchayat Yeloshi, Tal-Phaltan, Dist-Satara :-**

We are not at all opposing the expansion of the project. The project should be expanded. Without expansion of the project, the local people will not be benefitted. But local people should not suffer due to pollution of water and air. What measures will be initiated to prevent air pollution due to production

process? Today, the city residents are going out to get some good air. Hence, measures taken for air pollution control should be informed.

Project Environment Consultant remarked that this is one of the important questions. This is sugar factory. Here the bagasse will be used as fuel, which is available in plenty. After burning of bagasse in boiler, the ash will be produced. The Fly ash in bagasse is only 2% and sulfur content is 0.05%. It will be collected in silo & will be made available to local brick manufacturers.

We will install air pollution control devices to control pollution from chimneys. It is called it ESP i.e. Electro Static Precipitator. The efficiency of ESP is 99.9% to control the pollution. We will fix ESP to the stack/chimney.

As, there is less pollution from the fuel, the bagasse in the sugar factory is a by-product, which we use as fuel. It is very low in ash and sulfur. The height of the chimney and ESP will be as per the directives issued buy CPCB. These preventive steps will be taken to control air pollution.

**3) Shri Popat Mahadeo Pawar, Dy.Sarpanch, Darechi Wadi Grampanchayat, Tal-Phaltan, Dist-Satara :**

How the project expansion will benefit the local farmers?

Environment Consultant informed that the project includes an expansion of the sugar division. The advantage of farmers in this area is that the crop of sugarcane is very largely cultivated by the farmers in this area. With the expansion, capacity will increase and farmers will be able to harvest their crops on time.

The sugarcane crushing will be carried at the appropriate time. There will not be any delay. Project Proponent has planned to expand the distillery unit along with the sugar factory.

We are blending Ethanol into petrol in the ethanol blending program is as per the new policy of the Central Government. Now we blend 5% in petrol, next stage we will do 10% and thenafter we will go up to 20%.

Ethanol production will improve the financial condition of the factory. If the factory becomes financially strong, sugarcane growing farmers can be given extra price. The alternative will only benefit the farmers.

**4) Shri Dnyaneshwar Pundlik Sarat, Residence – Dhaval village, Tal – Phaltan, Dist – Satara :-**

How long will it take to expand and operate the project?

Environment Consultant informed that after obtaining the Consent and No Objection Certificate, firstly the sugar factory will be expanded. Afterwards co-gen will be expanded.

Expansion will be done in phases starting from 500.0 kiloliters per day to 1100.0 kiloliters per day in phases. The entire project will be operational in to 2 1/2 years.

The Convener of the Environment Public Hearing Committee appealed to the participants to fearlessly present any suggestions, objections regarding their proposed project.

5) **Shri H. Madhu Babu, Social Environment Worker, Rural Environment Education & Health Awareness Society, Hyderabad :-**

I want to give 2-3 suggestions. Project Proponent has planned to expand the project. Due to expansion of the project, there are chances for the additional job opportunities. Local people should be given priority in jobs.

Similarly, it appears that the green belt development in your project is going well. CSR and CER funds should be spent only in the project affected

areas. He had brought a request suggestions letter with him. He requested that the suggestions be sent to the Administration alongwith the environmental impact assessment report.

Member, Environmental Public Hearing Committee appealed the participants to raise any suggestions, objections regarding the proposed project. Those who want to submit written suggestion/objections, they can submit. It will be submitted alongwith minutes of the meeting, final EIA report to Ministry of Environment, Forests and Climate Change, Govt. of India, New Delhi.

Member, Environment Public Hearing Committee appealed again all the participants to raise any suggestions/objections. There was no response from the participants.

Member, Environment Public Hearing Committee thanked all participants for attending the meeting and raising the issues and as per permission of the Hon'ble Chairman, declared that the meeting is completed.

The meeting ended extending thanks to the Chair.

The 3 suggestions/objections received are enclosed.

**(L. S. Bhad)**
Convener,
Environment Public Hearing
Committee
And
Sub Regional Officer,
MPCB, Satara

**( Nitin Shinde , )**
Member,
Environment Public Hearing
Committee
And
In-charge Regional Officer,
MPCB, Pune

**(Sunil Thorve)**
Chairman,
Environment Public Hearing Committee
And
Additional District Magistrate-Satara,
Dist – Satara

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स स्वराज इंडिया ॲग्रो लिमिटेड (एसआयएएल), मुक्काम पोस्ट- उपळवे गाव, तालुका- फलटण, जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पातील प्रस्तावित विस्तारिकरण साखर प्रकल्प - ४,९००.० ते १५,०००.० टन प्रतिदिन, सहवीज निर्मिती प्रकल्प २२.५ मेगावॅट ते १००.० मेगावॅट पर्यत आणि मोलॅसिस/केन ज्युसवर आधारित आसवणी प्रकल्प - ६०.० केएलपीडी ते १,१००.० केएलपीडी प्रकल्पांच्या विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स स्वराज इंडिया ॲग्रो लिमिटेड (एसआयएएल), मुक्काम पोस्ट- उपळवे गाव, तालुका- फलटण, जिल्हा -सातारा, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पातील प्रस्तावित विस्तारिकरण साखर प्रकल्प - ४,९००.० ते १५,०००.० टन प्रतिदिन, सहवीज निर्मिती प्रकल्प २२.५ मेगावॅट ते १००.० मेगावॅट पर्यत आणि मोलॅसिस/केन ज्युसवर आधारित आसवणी प्रकल्प - ६०.० केएलपीडी ते १,१००.० केएलपीडी प्रकल्पांच्या विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार दिनांक २० ऑक्टोबर, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प स्थानी आयोजित करण्यात आलेली होती.

जिल्हाधिकारी, सातारा यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास बुधवार, दिनांक २० सप्टेंबर, २०२१ रोजी मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-९२ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी- २११०१४- एफटीएस-०१५० दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी,सातारा किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - अध्यक्ष

२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) - सदस्य

३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सातारा - आयोजक

श्री एल. एस. भड, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सातारा तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री सुनील थोरवे, अपर जिल्हादंडाधिकारी, सातारा तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री नितीन शिंदे, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी सांगितले कोविड-१९ संसर्गजन्य साथीच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशांनुसार बैठकीच्या स्थानी एकावेळी फक्त १०० व्यक्तींनाच एका सत्रात परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास त्यांना पुढील सत्रात संधि देण्यात येईल व सर्व उपस्थितांना जनसुनावणी बैठकीत संधि मिळेपर्यंत बैठक चालू ठेवण्यात येईल. आयोजक यांनी पुढे सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली.

आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री भड, आयोजक यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मेसर्स स्वराज इंडिया ॲग्रो लिमिटेड (एसआयएएल), मुक्काम पोस्ट- उपळवे गाव, तालुका- फलटण, जिल्हा - सातारा, महाराष्ट्र यांच्या कार्यरत प्रकल्पात प्रस्तावित विस्तारिकरण साखर प्रकल्प - ४,९००.० ते १५,०००.० टन प्रतिदिन, सहवीज निर्मिती प्रकल्प २२.५ मेगावॅट ते १००.० मेगावॅट पर्यत आणि मोलॅसिस/केन ज्युसवर आधारित आसवणी प्रकल्प § ६०.० केएलपीडी ते १,१००.० केएलपीडी प्रकल्पांच्या विस्तारिकरण संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प हा घोषित औद्योगिक विभाग क्षेत्राबाहेर कार्यान्वित असून प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ (सुधारित) अन्वये सर्व उत्पादनांसाठी एकत्रित - श्रेणी अ मध्ये [साखर उत्पादनासाठी - ५ (जे), मळी आधारित आसवणी प्रकल्पासाठी - ५ (जी) व सहविद्युत प्रकल्पासाठी- १ (डी)] मध्ये मोडत आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि जल वायू परिवर्तन विभागास पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्याची परवानगी सदरहू विभागाने दिनांक १४-०५-२०२१ रोजी त्यास मान्यता देण्यात आली.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार एक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, सातारा यांनी स्थानिक वृत्तपत्र पुढारी यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक १९ सप्टेंबर, २०२१ रोजी जाहिर जनसुनावणी सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते. श्री.एच.मधुबाबु, अध्यक्ष, रिहास, रुरल एन्व्हायरमेंट एज्युकेशन अँड हेल्थ अवेरनेस सोसायटी, मुशीराबाद, हैद्राबाद यांनी ई-मेलव्दारे सूचना तथा पाठिंबा दर्शविलेला आहे. तसेच एन.रमेश, एन्व्हायरमेंटल सोशल वर्कर, हैद्राबाद, तेलांगणा व के.अशोक, अध्यक्ष सेव्ह अर्थ मेट्रो अर्बन अँड रुरल डेव्हलमेंट सोसायटी, हैद्राबाद, तेलांगणा यांचेकडून देखील लेखी सूचना तथा पाठिंबा दर्शविलेला आहे.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल यांच्या प्रती विभागीय कार्यालय - पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर, मा. जिल्हादंडाधिकारी कार्यालय - सातारा, मा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - सातारा, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र - सातारा, तहसीलदार, फलटण तहसील कार्यालय-फलटण, जिल्हा सातारा, ग्रामपंचायत, कार्यालय मुक्काम पोस्ट- उपळवे गांव, तालुका फलटण, जिल्हा - सातारा, पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालय मुंबई, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - पुणे, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - सातारा, व मप्रनि मंडळाच्या संकतेस्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात सादरीकरणानंतर देऊ शकतात असे सांगितले. श्री भड यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सुरु करण्याची विनंती मा. अध्यक्षांना केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागारांनी पर्यावरणविषयक उपाय योजनांची माहिती सादरीकरणाव्दारे उपस्थित

जनसमूहास दिली. पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत माहिती देताना सांगितले की प्रकल्प प्रवर्तक विविध पर्यावरण संरक्षण सयंत्रणेसाठी भांडवली खर्च एकूण रुपये २,०२०.०० लाख खर्च करणार असून वार्षिक देखभाल व दुरुस्तीसाठी ७९.४५ लाख खर्च करणार आहेत.

प्रकल्प प्रवर्तकांनी कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी योजनेत (Corporate Environment Responsibility Fund) भारत सरकारच्या निर्देशांनुसार ०.५% निर्धारित केलेले आहे. प्रकल्पाची एकूण किंमत ९५० कोटी रुपये आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी रुपये ४.७५ कोटी प्रस्तावित केलेले असून ते पहिल्या पाच वर्षात निर्देशांनुसार खर्च करण्यात येतील.

प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा एकही थेंब प्रकल्पाबाहेर जाणार नाही. सदरहू प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण (झिरो लिक्विड डिस्चार्ज) प्रकल्प असेल. प्रकल्पातील हवा प्रदूषणाच्या संरक्षणासाठी अत्यंत आधुनिक अशी इलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर अशी सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. सदरहू प्रकल्प विस्तारिकरणामुळे स्थानिकांना प्रत्यक्ष रोजगाराची संधि मिळणार असून परिसरामध्ये अप्रत्यक्ष व्यवसायाच्या भरपूर संधी निर्माण होणार आहेत.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले सदरहू प्रकल्प विस्तारिकरण सध्या कार्यरत प्रकल्प स्थानावरच करणार असल्याने विस्तारिकरणासाठी अतिरिक्त जमिन लागणार नाही. ऊसामध्ये ७०% पाणी असते. उत्पादन प्रकियेत तयार झालेल्या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा उत्पादनात पुनर्वापर करण्यात येणार आहे.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे आक्षेप, सूचना, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. प्रश्नकर्त्याने आपले संपूर्ण नांव व पता सांगण्याची सूचना केली.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

<u>खालील व्यक्तींनी चर्चेत भाग घेतला-</u>

१) **श्री विठ्ठल सावंत, राहणार-सावंतवाडी,सीतामाईचा डोंगर, तालुका-फलटण, जिल्हा-<u>सातारा</u>:-**

आमच्या पंचक्रोशीत राहणा-या सर्व लोकांतर्फे ह्या प्रकल्प विस्तारिकरणासाठी अभिनंदन. सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे प्रकल्पात सर्व पर्यावरण नियम पाळले जातात का, हेही पहाणे गरजेचे आहे. प्रकल्प विस्तारिकरणासाठी १० कि.मी. परिघातील गावांचे सर्वेक्षण केलेले आहे. मात्र सावंतवाडी हे गाव उपळवे ग्रामपंचायतीत आहे. महसूल वेगळा झालेला नाही. तर सावंतवाडी गावात सर्वेक्षण का करण्यात आले नाही?

प्रकल्प विस्तारिकरण होणार आहे याबद्दल अभिनंदन. पण प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्याची विल्हेवाट कशी लावणार? सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा पुनर्वापर प्रक्रियेत करणार असतील, तर चांगलेच आहे. पण आमची

विनंती आहे की सांडपाण्याची विल्हेवाट ही प्रकल्पातच लावावी, प्रकल्पाबाहेर, नदीत सोडण्यात येऊ नये.

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की अतिशय महत्वाचा प्रश्न विचारला आहे. या भागाचे सर्वेक्षण करताना जे नमुने निवडले गेले, ज्यावेळी प्रतिनिधित्व करणारे नमुने निवडतो, त्यावेळी प्रकल्प स्थानाचेही नमुने घेतलेले आहेत, जवळचे उपळवे गावाचेही नमुने घेतलेले आहेत, १० कि.मी. त्रिज्येमधील नमुने घेतलेले आहेत.

दुसरा प्रश्न त्यांनी विचारला प्रकल्पामुळे उत्पन्न् होणारे सांडपाणी व त्याची विल्हेवाट. तर आता भारत सरकारच्या पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, नवी दिल्ली आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशांनुसार, आसवणी प्रकल्प हा शून्य द्रव निःस्सारण (Zero Liquid Discharge) असणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. प्रकल्पात आपण असे तंत्रज्ञान वापरणार आहोत की एमईई त्यास आपण मल्टी इफेक्अ इव्हॅपरेटर म्हणतो, उत्पन्न होणारा स्पेंट वॉशचे एमईई मध्ये बाष्पीभवन करणार असून त्यावर प्रक्रिया केली जाईल, त्यात जी वाफ उत्पन्न होईल त्यावर सी.पी.यु. (कन्डेन्सेट पॉलिशिंग युनिट)मध्ये प्रक्रिया करण्यात येईल व प्रक्रिया केलेले पाणी आपण उत्पादन प्रक्रियेत परत वापरणार आहोत. त्यात तयार होणारा जो लगदा आहे, त्यासाठी ७५ टीपीएचचा बॉयलर बसविणार असून त्यात तो जाळला जाईल.

२) <u>श्री रामदास हनुमंत जाधव, सदस्य, ग्रामपंचायत,येळोशी, तालुका-फलटण, जिल्हा-सातारा:-</u>

प्रकल्प विस्तारिकरणास आमची विरोध नाही. प्रकल्प वाढलाच पाहिजे. प्रकल्प वाढल्याशिवाय स्थानिक लोकांचा फायदा होत नाही. पण प्रकल्प विस्तारिकरणामुळे स्थानिक लोकांना पाणी, हवा प्रदूषणाचा कसलाही त्रास नको. उत्पादन प्रक्रियेमुळे हवा प्रदूषण जे होईल, ते टाळण्यासाठी काय उपाययोजना करणार आहात? आज शहरातला माणूस चांगली हवा घेण्यासाठी बाहेर येत आहे. तरी हवा प्रदूषण नियंत्रणासाठीच्या उपाययोजना सांगाव्यात.

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी मत मांडले की हा प्रश्न महत्वाचा आहे. हा साखर कारखाना आहे. यात आपण जे इंधन वापरणार आहोत, तो साखर कारखान्यातील बगॅस मोठ्या प्रमाणात वापरणार आहोत. बगॅसमध्ये फ्लाय एशचे प्रमाण फक्त २% आहे आणि सल्फरचे जे प्रमाण आहे, ते ०.०५% आहे. बगॅस बॉयलरमध्ये जाळल्यानंतर त्याची जी राख तयार होईल, ती राख सायलो आणि ईएसपीमधून गोळा केली जाईल व ती स्थानिक वीट निर्मिती करणा-यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. चिमणीतून प्रदूषण कमी व्हावे म्हणून हवा प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बसविणार आहोत. त्याला आपण ईएसपी (ईलेक्ट्रो स्टॅटिक प्रेसिपरेटर) म्हणतो. त्याची प्रदूषण कमी करण्याची क्षमता ही ९९.९% असते. ती यंत्रणा आपण चिमणी (स्टॅक)स बसविणार आहोत. आता येथे इंधनामध्ये प्रदूषण कमी आहे, साखर कारखान्यातील बगॅस हा उप-पदार्थ आहे, जो आपण इंधन म्हणून वापरतो. त्यात राखेचे,

सल्फरचे प्रमाण खूपच कमी आहे. चिमणीचे उंच व इएसपी ही केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेल्या मानकांप्रमाणेच कार्यान्वित करण्यात येईल. या उपाययोजना आपण हवा प्रदूषण नियंत्रणासाठी करणार आहोत.

३) <u>श्री पोपट महादेव पवार, उप-सरपंच, दरेची वाडी ग्रामपंचायत, तालुका-फलटण, जिल्हा-सातारा:-</u>

सदरहू प्रकल्प विस्तारिकरणाचा स्थानिक शेतक-यांना काय फायदा होईल?

या प्रकल्पात साखर विभागाचे विस्तारिकरण आहे. यात शेतक-यांचा फायदा म्हणजे या क्षेत्रात ऊसाचे प्रमाण चांगले आहे. विस्तारिकरण झाल्याने, क्षमता वाढेल व शेतक-यांच्या ऊसपीकाची वेळेवर तोडणी होईल. गाळप वेळेवर होईल. उशिर होणार नाही. प्रकल्प प्रवर्तकांनी साखर कारखान्याबरोबरच आसवणी प्रकल्पाचेही विस्तारिकरण योजिले आहे. केंद्र सरकारच्या नवीन धोरणानुसार इथेनॉल ब्लेडिंग कार्यक्रमात इथेनॉल पेट्रोलमध्ये एकत्रित करत आहोत. आता आपण ५% पेट्रोलमध्ये एकत्रित करतो, पुढे १०% करणार आहोत आणि पुढे २०% पर्यंत जाणार आहोत. इथेनॉल उत्पादनामुळे कारखान्याची आर्थिक स्थिती चांगली होईल. कारखाना आर्थिकदृट्या सबळ झाल्यास, ऊसाला अतिरिक्त भाव देता येईल. पर्यायाने शेतक-यांचा फायदाच होईल.

४) <u>श्री ज्ञानेश्वर पुंडलिक सरत,राहणार-ढवळ गाव, तालुका-फलटण, जिल्हा-सातारा:-</u>

प्रकल्पाचे विस्तारिकरण करुन कार्यान्वित करण्यासाठी किती कालावधी लागेल?

शासनाचे बंधनकारक परवाने, ना हरकत प्रमाणपत्रे मंजूर होऊन मिळाल्यानंतर प्रकल्पात प्रथम विस्तारिकरण साखर प्रकल्पाचे केले जाईल. त्यानंतर सहवीज निर्मिती प्रकल्पाचे केले जाईल. टप्याटप्याने ११००.० किलो लिटर प्रति दिवस करण्यासाठी प्रथम ५००.० किलो लिटर प्रति दिवस अशी सुरवात करुन टप्याटप्याने विस्तारिकरण करण्यात येईल. संपूर्ण प्रकल्प हा २ § २ १/२ वर्षात कार्यान्वित होईल.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास ते निर्भयपणे उपस्थित करण्याचे आवाहन केले.

५) <u>श्री एच.मधुबाबू, सामाजीक पर्यावरण कार्यकर्ता, रुरल एनव्हायरमेंट एज्युकेशन एन्ड हेल्थ अवरनेस सोसायटी, हैद्राबाद:-</u>

मी २-३ सूचना देऊ इच्छितो, प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्प विस्तारिकरण करण्याचे योजिले आहे. प्रकल्प विस्तारिकरणामुळे प्रकल्पात अतिरिक्त रोजगाराची संधि उपलब्ध होईल. त्यात स्थानिक लोकांनाच प्राधान्य देण्यात यावे. त्याचप्रमाणे असे दिसून येते की आपल्या प्रकल्पात हरितपट्टा विकसन योग्यप्रकारे चालले आहे. प्रकल्प बाधित क्षेत्रामध्येच सीएसआर आणि सीईआर निधि खर्च करण्यात यावा. त्यांनी सोबत निवेदन आणलेले होते. त्यांनी निवेदन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत वरिष्ठांना पाठविण्याची विनंती केली.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास ते उपस्थित करण्याचे आवाहन केले. ज्यांना लेखी निवदने द्यायची असल्यास ती सादर करावीत. बैठकीचे इतिवृत्त, अंतिम अहवालासोबत पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय. मुंबई यांना सादर करण्यात येईल.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना परत सूचना/आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी जनसुनावणी बैठकीस उपस्थित राहणा-यांचे आणि सूचना, आक्षेप नोंदविल्याबद्दल आभार व्यक्त केले व अध्यक्षांच्या आदेशानुसार पर्यावरणविषयक जनसुनावणी संपन्न् झाल्याचे घोषित केले.

अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी संस्थगित करण्यात आली.

सोबत ३ निवेदन जोडत आहे.

(एल. एस. भड)
आयोजक,
पर्यावरणविषयकजाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
सातारा

(नितीन शिंदे)
सदस्य,
पर्यावरणविषयकजाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
पुणे

(सुनील थोरवे)
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सातारा,
जिल्हा-सातारा